CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### घरावर दगड का मारतो असे विचारले असता मारहाण

**सोलापूर, दि.१७ मार्च-**

राजीव काशिनाथ सुर्वे व त्यांचा मुलगा प्रेम सुर्वे यांनी अजय संतोष जेटीथोर यांच्या घरासमोर जाऊन घरावर दगड का मारतो? असे विचारले असता, अरेरावीची भाषा करून, शिवीगाळ करून, जवळच पडलेली वीटेने राजू काशिनाथ सुर्वे यांच्या बोटावर व डाव्या बरगडीवर मारहाण केली. मुलगा प्रेम याला छातीवर व बोटावर मारहाण करून जखमी केले. याबाबत जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास ओव्होळ हे करत आहेत.

---

### कर पावतीवर नाव लावण्याकरिता केली फसवणूक

**सोलापूर, दि.१७ मार्च-**

शंभर रुपये बॉण्डवर दि. २९ ऑगस्ट रोजी एडवोकेट शिवानंद फथाटे कार्यालय जिल्हा न्यायालय सोलापूर येथून कब्जा करारपत्र करून परविन वसीम शेख रा. ४९८, भीमाशंकर नगर, नई जिंदगी, सोलापूर लिहून घेणार म्हणून सासू आरोपी जाकीर सलीम शेख व लिहून घेणारा परवीन वसीम शेख असे करारपत्र करून तसा बॉण्ड नावे करून जाकीर सलीम शेख हिने तिची मुलगी जरीना शब्बीर जमादार हीला मीच असल्याचे भासवुन नणंद जरीना शब्बीर शेख हिला बॉण्ड खरेदी करण्यास सांगून आधार कार्ड वरती तिचा फोटो लावून त्यावर बनावट सही व अंगठा करून तसा बनावट दस्त तयार करून त्याआधारे सोलापूर महानगरपालिका येथे कर पावतीवर नाव लावण्याकरिता फसवणूक केली, असे जेलरोड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद आहे.

---

### गल्लीत दादागिरी करतो का? असे म्हणत केली मारहाण

**सोलापूर, दि.१७ मार्च-**

घरासमोर येऊन दि.१५ मार्च रोजी अजय संतोष जेटीथोर हे घरी असताना राजू काशिनाथ सुर्वे, प्रथमेश राजू सुर्वे, प्रेम राजू सुर्वे, राहणार सोलापूर हे घराबाहेर बोलावून तो गल्लीत दादागिरी करतो का, गुंडागिरी करतो का असे म्हणून शिवीगाळ करू लागले. त्यावेळी त्यांना समजावून सांगत असताना तिघांनी तिथेच पडलेली वीट घेऊन, विटेने मारहाण केली. तसेच भाऊ बुद्धभूषण व आई ज्योती हे भांडण सोडविण्यास आले असता, त्यांनाही शिवीगाळ करून हाताने व विटाणे मारहाण केली. प्रथमेश सुर्वे यांनी त्याच्या घरातून चाकू आणून जेटीथोर यांच्या भावाच्या डोक्यात मारून त्याला जखमी केले. याबाबत दि. १६ मार्च रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

---

### पद्म-बिझनेस वुमन व पद्म-जलपरी पुरस्कार सोहळा रविवारी

**सोलापूर, दि.१७ मार्च-**

येथील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम व पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आठ महिलांना पद्म-बिझनेस वुमन अवॉर्ड तर, दोन महिलांना पद्म - जलपरी पुरस्कार रविवार, दि. २२ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या विणकर सभागृहात होणार आहे. अशी माहिती फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम, सखी संघमच्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा यांनी दिली. पुरस्कार सोहळा कार्यक्रम आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघमचे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, आदी प्रमुख उपस्थितीत वितरण कार्यक्रम होणार आहे. उद्योजक श्रीधर सुरा यांच्यातर्फे स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व नॅपकीन बुके प्रदान करण्यात येईल. ही निवड फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांनी केली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा कार्यक्रम होणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास पद्मशाली समाजातील बंधू व भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थिती रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### मनसे सभासद नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि.१७ मार्च-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसेचे नेते दिलीप धोत्रे, जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या नेतृत्वाखाली हाती घेण्यात आलेल्या सभासद नोंदणी उपक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. यावेळी शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष संतोष कुमार घोडके, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कोळी आदी उपस्थित होते.

# माध्यमिक शिक्षण विभागात ‘कोडवर्डस्’ चा खेळ?

- मान्यता, शालार्थ आयडीसाठी हेलपाटे
- ठराविक कारकुनामार्फत केली जातेय प्रक्रिया



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागात अतिरिक्त शिक्षकांच्या नियुक्त्या, वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी देणे, अनुदान आणि नियुक्ती संदर्भातील प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर येत आहेत. फाईल मंजुरीसाठी ‘शेंगदाणे’, ‘फुटाणे’ यांसारख्या ‘कोडवर्डस्’ अर्थात् सांकेतिक शब्दांचा खेळ सुरु असल्याची रंगतदार चर्चा शिक्षकांमध्ये सुरु आहे.

वैयक्तिक मान्यता, शालार्थ आयडी आणि इतर प्रशासकीय कामांसाठी शिक्षकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचेही समोर येत आहे. पारदर्शकता आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागात सुरु असलेल्या सर्व प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

माध्यमिक शिक्षण विभागात मिळालेल्या माहितीनुसार, काही विशिष्ट प्रकारच्या फाईली सादर करण्यासाठी ठराविक कारकुनामार्फतच प्रक्रिया केली जाते. या फाईल्स पुढे पाठवताना ‘शेंगदाणे की फुटाणे’ याचा निर्णय घेतला जातो, अशी चर्चा आहे. या सांकेतिक भाषेचा नेमका अर्थ केवळ संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच माहिती असल्याचेही बोलले जाते.

### ‘न्याय मिळतो’ या विश्वासाला तडा?

जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग हा जिल्ह्यातील सर्वात मोठा विभाग मानला जातो. येथे शिक्षकांना न्याय मिळतो, अशी धारणा असली तरी प्रत्यक्षात कामकाजाचा वेगळाच अनुभव येत आहे. याकडे लक्ष वेधताना ‘न्याय मिळतो’ या विश्वासाला तडा जात असल्याचे शिक्षकांकडून सांगण्यात येते.

### अनेक धक्कादायक बाबी समोर येऊ शकतात

मागील काही महिन्यांतील विभागातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येऊ शकतात. ही बाबत लक्षात घेवून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### मराठा समाजातील नगरसेवकांचा आज सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

सकल मराठा प्रबोधन प्रशिक्षण व संशोधन संस्था सोलापूरच्या वतीने सोलापूर महापालिकेतील यंदाच्या निवडणुकीत विजयी झालेल्या मराठा समाजातील नगरसेवकांचा बुधवार दि. १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती माऊली पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर महापालिकेत स्वीकृतसह एकूण १५ नगरसेवक मराठा समाजाचे निवडून आलेले आहेत. नूतन खासदार प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांचाही सत्कार यावेळी करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी प्रा.गणेश देशमुख, दत्ता मुळे, दिनकर जगदाळे उपस्थित होते.



**पानगळ...!**
वसंत ऋतू सुरु असून शहरात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात पानगळ झाल्याचे दिसून येत आहे. सोलापुरातील व्हीआयपी रोडवर टिपलेले छायाचित्र.

### आरटीईच्या नियमात बदल; ५ किमीपर्यंतच्या शाळा निवडण्याची मुभा

- ▶▶ मुदत २५ मार्चपर्यंत वाढली
- ▶▶ सोलापुरात दुप्पट अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

आरटीई अर्थात् शिक्षणाचा हक्क कायदा अंतर्गत २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. आता पालकांना एक किलोमीटरऐवजी तब्बल पाच किलोमीटरपर्यंतच्या शाळा निवडण्याची संधी मिळणार आहे. अर्ज सादर करण्यासाठी तसेच दुरुस्तीसाठी २५ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, या प्रवेशासाठी सोलापुरात दुप्पट अर्ज आल्याचे सांगण्यात येते.

पूर्वी शासनाच्या निर्णयानुसार पालकांना निवासस्थानापासून केवळ एक किलोमीटर अंतरातील शाळाच निवडता येत होती. या अटीविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ही अट शिथिल करण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाच्या आदेशानुसार पालकांना प्राधान्याने एक किलोमीटर, त्यानंतर तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटरपर्यंतच्या शाळांचे पर्याय निवडता येणार आहेत. त्यामुळे अधिक विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. १६ मार्चपर्यंत अर्ज केलेल्या पालकांना अर्जात दुरुस्ती करण्याची संधी देण्यात आली. यासाठी अर्ज ‘अनकन्फर्म’ करून पुन्हा ‘कन्फर्म’ करण्याची सुविधा पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात आरटीई अंतर्गत एकूण २८६ शाळांमध्ये २,८७२ जागा उपलब्ध आहेत. यामध्ये शहरातील १७ शाळांमध्ये २५७ जागा, तर जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील २६९ शाळांमध्ये २,६१५ जागा आहेत. आतापर्यंत सुमारे ४,५७० अर्ज प्राप्त झाले आहेत. मुदतवाढीनंतर आणखी अर्ज वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

#### अर्जातील दुरुस्ती

’आरटीई’ प्रवेशाच्या नियमावलीत बदल करण्यात आला आहे. आता पालकांना १ किमीऐवजी ३ ते ५ किलोमीटर परिसरातील शाळेत त्यांच्या पाल्याचा प्रवेश घेता येणार आहे. पूर्वी भरलेल्या अर्जात दुरुस्ती करण्यासाठी २५ मार्चपर्यंत मुदत आहे, असे ‘प्राथमिक’चे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

### पहिल्याच विकासकामांच्या उद्घाटनप्रसंगी खा.डॉ.प्रा.ज्योती वाघमारे झाल्या भावूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च**



राज्यसभेच्या नूतन खासदार डॉ. प्रा.ज्योती वाघमारे यांच्या हस्ते सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील जगजीवनराम झोपडपट्टी परिसरात ३० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन उत्साहात पार पडले. खासदारपदी निवडून आल्यानंतरच्या पहिल्याच विकासकामांच्या उद्घाटनप्रसंगी त्या भावूक झाल्या होत्या.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष निधीतून, शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्या पुढाकारातून येथील विकास कामे हाती घेण्यात आले आहेत.

याप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते साईनाथ अभंगराव, जिल्हाप्रमुख लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील, मनीष काळजे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखा आरती बसवंती, नगरसेवक प्रियदर्शन साठे यांच्यासह मनीष काळजे मित्रपरिवार व सेवालाल प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### रॉबिन हूड आर्मीच्या वतीने पुरणपोळी संकलन उपक्रम

**सोलापूर, दि.१७ मार्च-**

गुढीपाडवानिमित्त येथील रॉबिन हूड आर्मीच्या वतीने गुरुवार, दि.१९ मार्च २०२६ रोजी पुरणपोळी संकलन उपक्रम हाती घेण्यात आले. कुमठा नाका येथील बेघर वसाहत येथे डॉ.नवल शहा यांच्या हस्ते या पुरणपोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रा.हिंदुराव गोरे यांनी दिली. पुरणपोळ्या जमा करण्यासाठी ९४०४७०६७०० किंवा ७७७४०२४९६७ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी अनिकेत चनशेट्टी, पंकज चिंचोळी, कार्तिक कलबुर्गी, करण कलबुर्गी, ओंकार अतनुरे, रेवणसिध्द ठिस्के, अमित चनगौंड, किशोर कलबुर्गी आदी उपस्थित होते.



सोलापूर शहरातील मधला मारुती परिसरातील मिठाई गल्लीत गुढीपाडव्यानिमित्त साखरहारांची खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग दिसून आली.



सोलापूर : उन्हामुळे सर्व सर्व शाळा लवकर भरत व लवकर सुटत आहे. यावेळी बस पकडताना विद्यार्थी.

# लाडक्या बहिणींना एप्रिलमध्ये मिळणार एकरकमी ३ हजार रुपये

## सोलापुरातील लाखो बहिणी ठरणार अपात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

मुख्यमंत्री ‘माझी लाडकी बहीण’ योजनेतील लाभार्थी महिलांना जानेवारीनंतर आर्थिक मदत मिळालेली नाही. पात्र ठरलेल्या महिलांना फेब्रुवारी व मार्च महिन्यांचे प्रत्येकी १ हजार ५०० असे एकूण ३ हजार रुपये एकरकमी वितरित केले जाणार आहे. मात्र नव्या निकषांनुसार सोलापुरातील लाखो बहिणी यास अपात्र ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात या योजनेची सुरुवात मोठ्या प्रमाणावर झाली होती. प्रारंभी ११ लाख २० हजार ५६३ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. मात्र, शासनाने निकषांनुसार पडताळणी प्रक्रिया राबविल्यानंतर सुमारे ३ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. या पडताळणीत विविध अटी लागू करण्यात आल्या असून, अनेक लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आली आहेत.

योजनेत ‘ई-केवायसी’ प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली होती. यासाठी शासनाने तीन महिन्यांची मुदत दिली होती. तरीही सोलापूर जिल्ह्यातील १ लाखांहून अधिक महिलांनी ई-केवायसी केलेली नाही. ९८ हजारांहून अधिक महिलांची ई-केवायसी प्रक्रिया चुकीची आढळून आली आहे. ज्यांनी अजिबात ई-केवायसी केलेली नाही, त्यांना योजनेचा पुढील लाभ मिळणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले आहे.

योजनेच्या नव्या निकषांनुसार अपात्रतेसाठी काही ठोस अटी लागू करण्यात आल्या आहेत. एका कुटुंबातील दोनपेक्षा जास्त लाभार्थी, कुटुंबात चारचाकी वाहन असणे, २१ वर्षांखालील व ६५ वर्षांवरील महिला, तसेच इतर शासकीय वैयक्तिक लाभ योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे.

दरम्यान, ‘ई-केवायसी’ प्रक्रियेदरम्यान कुटुंबाच्या उत्पन्नाचीही तपासणी करण्यात येत आहे. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा लाभार्थ्यांची नावे वगळली जाणार आहेत. या निकषामुळे सोलापूर जिल्ह्यातील आणखी दीड लाखांहून अधिक महिला अपात्र ठरण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

#### लाडकी बहिणी योजनेवर एक नजर

सुरुवातीचे लाभार्थी : ११ लाख २० हजार ५६३
पडताळणीत अपात्र : सुमारे ३ लाख
‘ई-केवायसी’ न केलेले : १ लाख १३ हजार
‘ई-केवायसी’ चुकलेले : ९८ हजार ०२१
-यांना बसणार फटका
ई-केवायसी नसलेल्या महिला
दोनपेक्षा जास्त लाभार्थी महिला
चारचाकी व ट्रॅक्टर वाहन असलेले कुटुंब
२१ वर्षांखालील व ६५ वर्षांवरील महिला
शासकीय लाभ योजनांचे लाभार्थी महिला

#### शासनाकडे सादर करण्यात आली माहिती

अंगणवाडी सेविकांमार्फत सर्व लाभार्थ्यांची सखोल पडताळणी करण्यात आली. यांसदर्भातचा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्यात आली, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा


https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३८५

**पराविया नारी माऊली समान ।**
**मानिलिया धन काय वेंचे ।।**

स्त्रिविना पुरुष व पुरुषाविना स्त्री हे अधुरे आहेत. हे अधुरेपण नाहिसे करण्यासाठी निती नियमानुसार स्त्री-पुरुषांना एकत्र यावे लागते. अर्थात, एकत्र येण्यासाठी कांही निती-नियमांचे पालन करावे लागते. बुध्दी असूनही माणूस बऱ्याचवेळा आपली मनमानी चालवतो. त्याची ही मनमानी कोणावर तरी अन्याय करणारी सुध्दा ठरु शकते. काम हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असला तरीही तो धर्माने, निती नियमाने बांधला गेला आहे, हे विसरता कामा नये. स्वत:च्या मनावर नियंत्रण न ठेवता पुरुष जेव्हा कामवासना पूर्ण करण्यासाठी स्त्रीवर अत्याचार करतो किंवा स्त्रीशी अहेतूने वागतो तेव्हा बलात्कारासारख्या घटना घडतात. स्त्रीच्या इच्छेविरुध्द कामवासनांची पूर्ती करणाऱ्यांची संख्या कांही कमी नाही. एवढेच काय तर काही विवाहित पुरुषसुध्दा बऱ्याचवेळा परस्त्रीकडे वाईट नजरेने पाहतात किंवा तिच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतात. स्त्री ही एक भोगाची



वस्तू आहे, असे सुध्दा काही अज्ञानी मानतात. स्त्रीने पतिव्रता असावे अशी अपेक्षा करणारा पुरुष स्वत:च्या बाबतीत मात्र पत्नीव्रताचे पालन करेलच असे नाही. प्रभू रामचंद्रासारखे पत्नीव्रत धारण करणाऱ्यांची संख्या समाजात कमी असल्याने संत महात्म्यांना या विषयाकडे वळावे लागले आहे. पुरुष स्त्रीच्या बाबतीत चुकीच्या पध्दतीने वागत असल्याने स्त्रीयांवरील अत्याचार वाढत आहेत. परस्त्रीकडे माता, भगिणी म्हणून पाहिले तर वाईट किंवा चुकीचे कांही घडणार नाही. परस्त्रीला आईच्या स्वरुपात पाहण्यासाठी, तिला माता, भगिणी मानण्यासाठी कांही धन खर्च करावे लागत नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, पराविया नारी माऊली समान । मानिलिया धन काय वेचे ।।

स्त्रियांवरील वाढते अन्याय, अत्याचार पाहिले म्हणजे महाराजांच्या दूरदृष्टीची कल्पना आपणाला येते. समाजात अनेक प्रश्न काही अज्ञानी पुरुषाच्या वाईट नजरेमुळे, कामवासनेमुळे निर्माण होत असतात. काही लोक अर्धांगिणी म्हणून स्त्रीचा स्विकार करुनही पुरुष तिला अर्धांगिणीचे स्थान देत नाहीत. माता-पिता, आई-वडील, राधे-कृष्ण, सीता-राम, स्त्री-पुरुष या महत्वपूर्ण जोड शब्दांचा प्रारंभ माणूस स्त्रीशब्दाने करतो. तिला पुरुषापेक्षा आद्य स्थान देतो. प्रत्यक्ष कृतीत मात्र उलटेच वागतो. भगवंताची सेवा, भक्ती करायची असेल तर तिथे कुविचाराला स्थान नसते. कामवासनेत अडकलेला माणूस एकाग्र असू शकत नाही. स्त्रीविषयक भोगवादी दृष्टीकोन एकाग्रतेत अडसर ठरु शकतो. पत्नीशी असणारी एकरुपता ही ईश्वराची एक प्रकारची भक्तीच आहे. परस्त्रीबद्दलचे आकर्षण हा व्यभिचार आहे. व्यभिचाराला अध्यात्मात स्थान नाही. व्यभिचारी वृत्ती एड्ससारख्या महाभयंकर रोगाला आमंत्रण देते. बदनामी बरोबर मृत्यू ओढवून घेणाऱ्या कामवासनेला नियंत्रित करण्याचा प्रयन्त केला पाहिजे. तुकाराम महाराजांचे हे भावनिक आवाहन सर्वांनिच पाळण्याचा प्रयन्त केला तर समाजातील अनेक प्रश्न आपोआप कमी होतील व जीवनातील आनंदलहरी वाढण्यास मदत होईल, यांत शंका वाटत नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. १८ मार्च २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन कृ. चतुर्दशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पू. भाद्रपदा (२९.२०)
योग - शुभ (२८.००)
करण - चतुष्पाद (१९.४३)
राहू काल : बुधवार
दु. १२.४७ ते २.१७

दिनविशेष :
१९४४: नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने ब्रह्मदेशमार्गे भारतात प्रवेश करून मणीपूरच्या सीमेवर ब्रिटिशांचा पाडाव करून तिरंगा फडकावला।
१९४८: एकनाथ सोलकर भारतीय क्रिकेटपटू अष्टपैलू खेळाडू यांचा जन्म.
२००१: सरोदवादक अमजद अली खान यांना 'गंधर्व पुरस्कार' जाहीर झाला.



## अमरजीवी पोट्टी श्रीरामुलु यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम, सोलापूर येथे अमरजीवी पोट्टी श्रीरामुलु यांच्या शतकोत्तर रौप्य जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व द्वीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी ग्रंथालयमचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांनी अमरजीवी पोट्टी श्रीरामुलु हे भारताच्या भाषावर प्रांतरचनेचे जनक होते,असे संबोधले. सहसचिव प्रभाकर भिमनाथ यांनी पोट्टी श्रीरामुलु यांचा स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान अतुलनीय होते असे मत व्यक्त केले. कवी प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी पोट्टी श्रीरामुलु यांच्या कार्याची माहिती सर्वांना परिचित होण्यासाठी त्यांचे तेलुगु भाषेतील बालसाहित्य मराठीत अनुवाद करण्याचा मानस व्यक्त केला.

पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड श्रीनिवास क्यातम यांनी पोट्टी श्रीरामुलु यांनी ५८ दिवस सत्याग्रह करून आपले प्राण अर्पण करून तेलुगु भाषिकांसाठी आंध्रप्रदेश राज्याची निर्मितीचे तारणहार ठरले असे मत व्यक्त केले.तसेच पोट्टी श्रीरामुलु यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त ग्रंथालयामर्फत वर्षभर कार्यक्रमाचे आयोजन करावे, अशी इच्छा व्यक्त केली.

सदरच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवियत्री रेणुका बुधारम यांनी केले तर आभार प्रदर्शन सचिव तिपण्णा गणेरी यांनी मानले. सदरच्या कार्यक्रमाला ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुडूर ,पुरुषोत्तम बुधारम, उपाध्यक्ष श्रीनिवास यनगंदूल तसेच परिसरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या रँकिंगमध्ये सोलापूर महापालिकेचा तृतीय क्रमांक

### पिंपरी-चिंचवड प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने जाहीर केलेल्या जानेवारी २०२६ च्या 'महानगरपालिका आरोग्य रँकिंग'मध्ये सोलापूर महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात तिसरे स्थान पटकावले आहे. ४८.५२ गुण मिळवत सोलापूरने राज्यातील प्रमुख महानगरपालिकांमध्ये आरोग्य सेवांच्या अंमलबजावणीत आपली मजबूत स्थिती दाखवून दिली आहे.

या रँकिंगमध्ये ५१.४१ गुणांसह पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रथम क्रमांकावर असून ४९.६३ गुणांसह कोल्हापूर महानगरपालिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर सोलापूर महानगरपालिका ४८.५२ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर राहिली आहे. सांगली (४६.१२) आणि नवी मुंबई (४३.८५) यांनी अनुक्रमे चौथा आणि पाचवा क्रमांक मिळवला आहे. आरोग्य विभागाने दिलेल्या अहवालानुसार, माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य, क्षयरोग नियंत्रण (), रेबीज नियंत्रण तसेच आयुष्मान भारत हेल्थ अँड वेलनेस सेंटर (-) यांसारख्या विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर आधारित हे रँकिंग तयार करण्यात आले आहे.




सोलापूर महानगरपालिकेने शहरातील नागरी आरोग्य केंद्रे, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण मोहिमा तसेच संसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण यामध्ये केलेल्या कामामुळे हे यश मिळाल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेची कामगिरी मात्र अपेक्षेपेक्षा खालावलेली दिसून आली आहे. या रँकिंगमध्ये मुंबई २६.०२ गुणांसह शेवटच्या स्थानावर राहिली आहे.

आरोग्य सेवा आयुक्तालयाने ज्या महानगरपालिकांची कामगिरी असमाधानकारक आहे, त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देऊन कामकाजात सुधारणा करावी आणि विविध आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश दिले आहेत. राज्यातील महानगरपालिकांच्या आरोग्य सेवांची सद्यस्थिती समोर आणणारे हे रँकिंग नागरी आरोग्य व्यवस्थेतील स्पर्धात्मकता वाढवणारे ठरत असून, सोलापूरसारख्या शहरांसाठी ही कामगिरी निश्चितच अभिमानाची बाब मानली जात आहे.

## रिक्षा-टॅक्सी चालक मंडळाची सभासद फी कमी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**



राज्यसभेच्या नूतन खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांना ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची सभासद फी कमी करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या शिष्टमंडळाने सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांची भेट घेऊन हे निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये मंडळाच्या सभासद फीमध्ये कपात करून ती बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळप्रमाणे नाममात्र एक रुपया करावी अशी मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून अधिकाधिक चालकांना कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येईल.

शिष्टमंडळात महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, महासचिव प्रदीप शिंगे, इलियास सिद्दीकी, इमरान शेख, इस्माईल गुंता यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## विवेक विचार मंचच्या शहर संयोजकपदी बाबरे

### आंबेडकर चळवळीतील तरुण कार्यकर्त्याला नेतृत्वाची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**





विवेक विचार मंचच्या सोलापूर शहर शाखेच्या संयोजकपदी आंबेडकर चळवळीतील तरुण, तडफदार व अभ्यासू कार्यकर्ते सिद्धांत सूर्यकांत बाबरे यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा संयोजक अश्विनी चव्हाण यांनी शहर शाखेची नवी कार्यकारिणी जाहीर करत ही घोषणा केली.

यावेळी मावळते शहर संयोजक ॲड. प्रशांत कांबळे यांना संघटनेत बढती देण्यात आली असून त्यांची जिल्हा सहसंयोजक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत ही जबाबदारी देण्यात आल्याची माहिती मंचाच्या वतीने देण्यात आली.

**विवेक विचार मंच, सोलापूर शहर व जिल्हा शाखा कार्यकारणी याप्रमाणे -**

अश्विनी चव्हाण : जिल्हा संयोजिका, ॲड.प्रशांत कांबळे : जिल्हा सहसंयोजक, श्री.सिद्धांत बाबरे : शहर संयोजक, प्रा. डॉ.धानेश लिगाडे: विमर्श प्रमुख. सीमा भंडारी: सह विमर्श प्रमुख., ॲड. संदेश देवकर : मीडिया प्रमुख, ॲड. जयराज नंदुरकर : सह मीडिया प्रमुख, प्रीती उडाणशिव : कार्यक्रम प्रमुख., ॲड. आरती आंबीगार : कार्यक्रम सह प्रमुख, ॲड.वैशाली महिंद्रकर : विधी प्रमुख, ॲड. जितेंद्र मोरे : सह विधी प्रमुख, ॲड. लक्ष्मण वाघमारे : सह विधी प्रमुख, कमलाकर सोनकांबळे: अक्कलकोट., प्रा. डॉ. सागर कांबळे: बार्शी., गोपाळ वाघमारे : करमाळा., दशरथ वडतिले : कार्यकारिणी सदस्य., गौरीताई आमडेकर : कार्यकारिणी सदस्य., ममता मादगुंडी : कार्यकारिणी सदस्य., ॲड. धीरज खंदारे : मोहोळ.

## तंत्रशिक्षण परिवर्तनासाठी तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

ए. जी. पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत तंत्रशिक्षणामधील सर्वांगीण परिवर्तन या विषयावर आधारित तीन दिवसीय ऑनलाईन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आयोजित करण्यात आला होता. हा प्रोग्राम महाविद्यालयातील ह्युमॅनिटी अँड सायन्स विभाग व यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला गेला. या कार्यशाळेत राज्यातील विविध तंत्रशिक्षण संस्थेमधील शंभरहून अधिक प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. रणजीत सावंत यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. कार्यशाळेच्या तीन दिवसीय



ऑनलाइन सत्रात प्रत्येक दिवशी दोन सत्र ठेवण्यात आले होते आणि या सत्रात शैक्षणिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तींनी मोलाचे मार्गदर्शन केले. यात पहिल्या दिवशी अंजू रॉली यांनी अध्यापन आणि मूल्यमापन पद्धतीतील बदल या विषयावर आणि डॉ. माया इंगळे यांनी शिक्षणातील आऊट कम बेस्ड एज्युकेशन यातील अमुलाग्र बदल यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवसाच्या सत्रात सुद्धा सर्व सहभागी प्राध्यापकांसाठी उत्कृष्ट असे मार्गदर्शनपर सत्र आयोजित केले गेले, यात डॉ. कल्लूरकर यांनी भारतीय ज्ञानाचा तंत्रशिक्षणात झालेला समावेश या विषयावर आणि डॉ. सज्जन यांनी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवसातील सत्रात रोहिणी बापट यांनी तणाव मुक्त आणि आंतरिक संतुलन कसे राखले पाहिजे यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे समन्वयक प्राध्यापक व्ही आर आवटे यांनी आभार मानले. या उपक्रमासाठी अध्यक्ष श्री सिद्धेश्वर अण्णाराव पाटील, सचिव शिवानंद सिद्धेश्वर पाटील, आय. एस. टी. ई. नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. पी. के. देसाई, संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एम ए चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहितेचे मार्गदर्शन लाभले.

## युगंधर फाउंडेशनतर्फे पर्यावरण संवाद सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

युगंधर फाउंडेशन यांच्या वतीने दि. २० ते २६ मार्च दरम्यान पर्यावरण संवाद सप्ताह आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी दिली.

२० मार्च रोजी जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवाद सप्ताहाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी पक्षांसाठी कृत्रिम घरटी वाटप तसेच जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच २० ते २४ मार्च दरम्यान मधमाशी पालन विषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. २१ मार्च रोजी युगंधर फाउंडेशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त पर्यावरण व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना युगंधर नवरत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. २२ मार्च रोजी जागतिक जल दिनानिमित्त सोलापूर येथील आदिला नदीवर क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली आहे. २३ मार्च रोजी जागतिक हवामान दिनाचे औचित्य साधून हवामान बदल आणि मानवी जीवन यांचा सहसंबंध या विषयावर तज्ज्ञांचे ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे. तसेच २४ व २५ मार्च दरम्यान विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये पर्यावरणातील बदल आणि कॅन्सरचा वाढता प्रादुर्भाव या विषयावर जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. २६ मार्च रोजी पर्यावरण संवाद सप्ताहाचा समारोप सिद्धेश्वर वनविहार येथे क्षेत्रभेट व विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरणाने करण्यात येणार असून हा कार्यक्रम युगंधर फाउंडेशनच्या आम्ही निसर्ग यात्री या केंद्रात आयोजित करण्यात येणार आहे.



## महिला महोत्सवात गायक मोहम्मद अयाज यांचा माँ तुझे सलाम कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

नुकतेच महीला दिनानाचे औचित्य साधून महीला महोत्सवात २०२६ हा भव्य दिव्य कार्यक्रमात महाराष्ट्रा चे महागायक विजेते मोहंम्मद अयाज यांनी मॉ तुझे सलाम सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

यावेळेस भारतीय जनता पार्टी च्या अध्यक्षा रोहीणी ताई तळवळकर, स्थायी समितीच्या चेअरमन रंजीता चाकोते, माजी महापौर कंचना यन्नम, सरचिटणीस सुधा अळ्येमरी, आमदार देवेंद्र कोठे यांच्या पत्नी मोनिका कोठे, ऑर्किडच्या वर्षा विभुते, नगरसेवीका कुडक्याल, नगरसेवीका कामाठी सोलापूर महानगर पालीकाच्या सर्वच नगरसेवीका सह हजारों- महीला वर्ग उपस्थित होत्या. या कार्यक्रमात मोहम्मद अयाज व सह कलाकार निरनिराळी गाणी सादर करून समस्त महिलावर्गास भारावून टाकले. हा कार्यक्रम दिनांक १४ मार्च रोजी सुशिल रसिक सभागृह सोलापूर येथे पार पडला.

## नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजनेंतर्गत 'टुरिस्ट गाईड ट्रेनिंग'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना अंतर्गत पुणे प्रादेशिक विभागातील इच्छुक युवक-युवतींसाठी ७ दिवसीय Tourist Guide Training आयोजित केले आहे. इच्छुकांनी २० मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत गुगल फॉर्मद्वारे अर्ज करावा. अर्जांची निवड प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. या प्रशिक्षणामध्ये पर्यटन स्थळांवर मार्गदर्शन, आदरातिथ्य सेवा तसेच पर्यटन क्षेत्राशी संबंधित विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यात येणाऱ्या पर्यटकांना स्थानिक पर्यटन स्थळांची माहिती करून देण्यासाठी पर्यटन संचालनालयामार्फत पर्यटन सुलभ मार्गदर्शक (टूर गाईड) तयार करण्यात येणार आहेत. यासाठी स्थानिक युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे, अशी माहिती पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक भरत लांधी यांनी दिली आहे. पुणे प्रादेशिक विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील इच्छुक उमेदवारांना या प्रशिक्षणामध्ये सहभागी होता येणार आहे. पुणे प्रादेशिक विभागातील प्रसिद्ध पर्यटनस्थळांबाबत पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी २०० युवकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सात दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना पर्यटन संचालनालयाकडून प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच सिंहस्थ कालावधीत टूर गाईड म्हणून काम करण्यासाठी ओळखपत्रही देण्यात येणार आहे.

## जिल्ह्यात गॅस वितरणासाठी २४७ आपत्कालीन कक्ष सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याने सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी गॅस सिलेंडर वितरणात अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने गॅस वितरणाबाबत कडक उपाययोजना अंमलात आणण्यास सुरुवात केली असून, जिल्ह्यात योग्य पद्धतीने गॅस वितरण व्हावे यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मान्यतेने जिल्हाधिकारी कार्यालयात २४७ आपत्कालीन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

नागरिकांना गॅस किंवा पेट्रोल वितरणाबाबत कोणतीही अडचण अथवा तक्रार असल्यास ०२१७-२७३१०१२ या क्रमांकावर संपर्क करून तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. आपत्कालीन कक्षामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील गॅस वितरणाबाबत तक्रारीसाठी तालुकानिहाय संपर्क पुढीलप्रमाणे करता येतील. पुरवठा निरीक्षण अधिकारी : मोहोळ-सोनाली निटुरे ९०२२००८६८१ संबंधित अधिकारी-महेश घोडके ९४२००८९४६४, माढा-प्रितम पवार-९९७०८२७५७४ जी.जी. कुथलवाड ९०२८०६५४१२,

करमाळा-शत्रुघ्न चव्हाण ८८०५९०७६८६ दिव्यांश्री ढोबळे ८२७५७५३३६१, पंढरपूर -विजय बादल-९८८१२३५५९४, सांगोला-प्रांजली गावंडे : ७२१९६१६६६३/ प्रियांका राजेश जाधव ७७७४३८५७८३८, मंगळवेढा - शितल कन्हेरे-८३९०५७२२५७ जयंत कुलकर्णी ९१७५६२६७४९, माळशिरस - रविकिरण शेटे : ८२७५९२६९५५ एस. डी. केमकर - ७०२८१२२२९४,

बार्शी - निलेश आठवले : ७२०१८९८१३४४ / संतोष शिंदे : ९८१८५६२५३२, उत्तर सोलापूर-निखिल महानूर : ९८६९०५०८१६१/ किरण सुरुशे : ७४४७८१४५७२९, दक्षिण सोलापूर - नासिरखान पठाण : ९८८१५६३६९३/ रमा अमोल शिखरे - ८४३३६२८६९७, अक्कलकोट - विराज वासेकर : ८०५५९०४९१७/ पल्लवी शेडगे : ९७६६१४५९८६

## तेलुगु भाषा काव्य स्पर्धा; २४ मार्चपर्यंत अंतिम मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

अमरजीवी पोट्टी श्रीरामुलु यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंतीनिमित्त तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम, सोलापूर मार्फत अमरजीवी पोट्टी श्रीरामुलु या विषयावर काव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

तरी इच्छुकांनी आपली कविता २४/०३/२०२६ पर्यंत कवियित्री रेणुका बुधारम यांच्या भ्रमणध्वनी ७८८८१५६५३० या नंबर तेलुगु कविता पाठवाव्यात, असे आवाहन ग्रंथालयमचे अध्यक्ष मल्लिकार्जुन यांनी केले. यावेळी सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

## प्रा. डॉ. शिवाजी मस्के यांच्या संशोधनास यूके देशाचे पेटंट मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

येथील संगमेश्वर महाविद्यालयातील भूगोल विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी मस्के यांनी विकसित केलेल्या टॅबलेट आधारित पोर्टेबल भौगोलिक सर्वेक्षण उपकरणास युनायटेड किंगडम देशाकडून पेटंट मंजूर झाले आहे. आंतरराष्ट्रीय यश संपादन करून त्यांनी सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे.



डॉ. मस्के यांनी विकसित केलेली ही प्रणाली पूर्णपणे डिजिटल व टॅबलेट-आधारित असून भौगोलिक सर्वेक्षणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. स्थान निर्धारण, डेटा संकलन, साठवण प्रक्रिया आणि संप्रेषण तंत्रज्ञान यांचा एकत्रित वापर या उपकरणात करण्यात आला आहे.

क्षेत्रीय काम करताना प्रत्यक्ष वेळेत भूसंदर्भित माहिती संकलित करण्याची क्षमता या प्रणालीत आहे. त्यामुळे सर्वेक्षण करताना स्थान, फोटो, मोजमाप व आवश्यक नोंदी अचूकपणे करते. डॉ. मस्के यांचे हे उपकरण स्थानिक पातळीवर डिजिटल सर्वेक्षण अधिक सक्षम करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ६४५ सरपंचांना प्रशासक पदाची संधी

## सहा महिन्यांची मुदतवाढ जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यात मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, ६५० पैकी तब्बल ६४५ ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे संबंधित सरपंचांना पुढील सहा महिन्यांसाठी कारभार चालवण्याची संधी मिळाली आहे.

या मुदतवाढीमुळे सरपंचांना गावातील नियमित प्रशासकीय कामकाज, विकासकामांची अंमलबजावणी, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षणाशी संबंधित प्रश्न सोडवणे, तसेच जिल्हा परिषदेकडे विविध प्रस्ताव सादर करण्याचे अधिकार कायम राहणार आहेत. विशेष म्हणजे, या कालावधीत सदस्यांना सरपंचांविरुद्ध अविश्वास ठराव मांडता येणार नाही.

### उर्वरित ग्रामपंचायतींसाठी मार्गदर्शक सूचना मागविल्या

शासनाच्या आदेशानुसार बहुतांश ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्ती पूर्ण करण्यात आली असून, उर्वरित ग्रामपंचायतींसाठी मार्गदर्शक सूचना मागवण्यात आल्या आहेत. त्या प्राप्त होताच पुढील कार्यवाही केली जाईल.

**- सूर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

दरम्यान, काही ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपद रिक्त असल्याने त्या ठिकाणी प्रशासक नियुक्तीबाबत शासनाकडे मार्गदर्शन मागवण्यात आले आहे. पंढरपूर, माढा, बार्शी आणि उत्तर सोलापूर तालुक्यांतील काही ग्रामपंचायतींमध्ये सरपंच अपात्र ठरल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे.

याशिवाय, २०२५ मध्ये मुदत संपलेल्या ५३ ग्रामपंचायतींवर सध्या विस्तार अधिकाऱ्यांकडे प्रशासकीय जबाबदारी देण्यात आली आहे. नव्याने स्थापन झालेल्या काही ग्रामपंचायतींमध्येही सरपंच नसल्याने तेथे प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया प्रलंबित आहे. एकूणच, या निर्णयामुळे प्रशासनाचा कारभार सुरळीत ठेवण्यास मदत होणार असली, तरी उर्वरित ग्रामपंचायतींवरील नियुक्तीबाबत शासनाच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### तालुकानिहाय ग्रामपंचायतींची संख्या

- मंगळवेढा - २३,
- पंढरपूर - ७०,
- करमाळा - ५१,
- माढा - ८२,
- माळशिरस - ४६,
- बार्शी - ९५,
- मोहोळ - ७२,
- अक्कलकोट - ७१,
- दक्षिण सोलापूर - ५२,
- सांगोला - ६१,
- उत्तर सोलापूर - २४.

---

## महत्वाचे...

### शेगांव येथे श्री लायव्वा देवी यात्रेस आजपासून प्रारंभ



**सोलापूर, दि. १७ मार्च-**

शेगांव (ता.अक्कलकोट) येथील ग्रामदैवत श्री लायव्वा देवी यात्रेस आज बुधवारी दि.१८ मार्चपासून प्रारंभ होत आहे. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.१८ मार्च) रोजी श्रींच्या मुर्तीस तैलाभिषेक (यण्णीमंजन) होईल. गुरुवारी दि. १९ मार्च रोजी गुढीपाडव्याचे औचित्य साधून सायंकाळी सात वाजता गावात श्रींच्या पालखीची सवाद्य मिरवणूक निघणार आहे. श्रींची पालखी मंदिरात आल्यानंतर भाकणूक होईल. तर दिवसभर श्री लायव्वा देवी यांची भाविकांकडून ओटी भरुन संकल्प सिध्दीचा विधी होणार आहे. त्यानंतर रात्री ८ वाजता शोभेचा दारुकाम होईल. शुक्रवारी २० मार्च रोजी सकाळी ९ वाजता भौरम्मा करजगी यांचे श्री ब्रमदेवर डोळीन गायन संघ करजगी (ता. जत ) व शांता हडलगेरी यांचे अमोगसिद्ध गायन संघ यांचे ढोळीन पद (ढोलकी गीत) सादर करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी चार वाजता नामवंत मल्लांचे जंगीकुस्त्या होणार आहे. या विजेत्या मल्लांना पंचकमिटीच्यावतीने बक्षिस देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्याचदिवशी रात्री १० वाजता लायव्वा देवी नाट्यसंघ शेगांव प्रस्तुत श्रृंगारद अरमने भंगारद वडती अर्थात अनाथवाद देव मंदिर हा सुंदर सामाजिक कन्नड नाटक सादर होणार आहे. भाविकांनी या यात्रेतील धार्मिक विधींचा लाभ घ्यावे, असे आवाहन श्री लायव्वा देवी देवस्थान यात्राकमिटीने केले आहे.



### हाजी हाशमोद्दीन तांबोळी ट्रस्टच्या वतीने ईदनिमित्त किराणा कीटचे वाटप

**जेऊर दि.१७ मार्च-**

रमजान ईद निमित्त हाजी हाशमोद्दीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करमाळा मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी उस्मानशेठ तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली रमजान ईद निमित्त शिरखुर्मा व किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. करमाळा औद्योगिक वसाहती मधील कार्यालयात हाजी अल्ताफ शेठ तांबोळी यांच्या वतीने ३००-३५० कीट चे वाटप करण्यात आले. यावेळी अमीरशेठ तांबोळी (राष्ट्रवादी युवा शहराध्यक्ष), इंदाज वस्ताद, फारुक जमादार, सोहेल पठाण वस्ताद (राष्ट्रवादी शहर अध्यक्ष), अझहर भाई शेख, अमीन बेग, मुश्ताक शेख, अफरोज पठाण, अरमान शेख, अनस बागवान, मुख्तार पठाण, सफरोज आतार, शाहरूख पठाण, नईम पठाण, फरहान शेख इ. जण उपस्थित होते.



### कोंडीच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. पृथ्वीराज माने यांच्या हस्ते लसीकरण शुभारंभ

**सोलापूर, दि. १७ मार्च-**

९ ते १४ वर्षाच्या मुलींना गर्भाशय मुखाचा कॅन्सर टाळण्यासाठी एचपीव्ही लस महत्त्वाची असून, राज्यातील ९ लाख ८४ हजार मुलींना मोफत लसीकरण करण्यात येणार आहे. ही लस रिसर्च करूनच तयार करण्यात आली असून यामुळे भीतीचे काही कारण नसल्याचे जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने यांनी सांगितले. कोंडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ माने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी पंचायत समिती सदस्य धनाजी भोसले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आयवळे, कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी सुनील कांबळे, डॉ.प्रशांत बांगळे, विकास भांगे, मुस्ताक पटेल, डॉ.मुलानी मॅडम आदी उपस्थित होते.



### अकलूजच्या शिवशंकर बझारचा दुहेरी सन्मान

**अकलूज, दि. १७ मार्च-**

येथील शिवशंकर मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था संचलित शिवशंकर बझारने २०२५ या वर्षात उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत राष्ट्रीय स्तरावर दुहेरी मानाचा सन्मान पटकावला. हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि कारगिल फूड सोल्युशन्स साऊथ एशिया या नामांकित कंपन्यांकडून संस्थेचा गौरव करण्यात आला. हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेडकडून उत्कृष्ट भागीदारी आणि उल्लेखनीय सहकार्याबद्दल संस्थेला ''कौतुक पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. पश्चिम विभागाच्या महाव्यवस्थापक नीरजा चौधरी यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. याबरोबरच कारगिल फूड सोल्युशन्स साऊथ एशियाकडूनही शिवशंकर बझारला मोठा सन्मान मिळाला. वरिष्ठ संचालक शैलेश खुराणा आणि संचालक कुंदनकुमार मिश्रा यांच्या हस्ते ''सुपरस्टार्स'' स्टार रिटेल आऊटलेट प्रमाणपत्र देण्यात आले. भारतातील टॉप १००० स्टार रिटेल आऊटलेट्समध्ये स्थान मिळवत कारगिलच्या वाढीत योगदान दिल्याबद्दल हा सन्मान संस्थेच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांनी स्वीकारला. संस्थापक स्व. उदयसिंह मोहिते पाटील यांच्या ध्येय धोरणानुसार आणि शिवरत्न उद्योग समूहाचे चेअरमन कीर्तिध्वजसिंह व अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल सुरू आहे. शिवशंकर बझारच्या चेअरमन डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांनी व्यवस्थापक गोपाळराव देशमुख, व्हाइस चेअरमन मदन भगत, संचालक किसनराव धुमाळ, अर्जुन भगत, सिनाप्पा वाघमोडे, कैलास ताटे, अनिल उघडे, नारायण फुले, सर्व संचालक, चीफ अकाउंटंट उत्तम गुरूगुळे, चिफ परचेस ऑफिसर सुरेंद्र माने आदींची अभिनंदन केले.

---




## नोकरी लागल्यानंतर 'आपुलकी'ला देणगी देवून व्यक्त केली कृतज्ञता

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ मार्च -**

मूळचा जवळा (ता.सांगोला) येथील रहिवासी व सध्या सोलापूर येथे वास्तव्यास असलेल्या ऋषिकेश जाधव याला एप्रिल २०२१ मध्ये कोरोनाच्या काळात इंजिनियरिंगला प्रवेश मिळाला होता.

परंतु नियमित कॉलेज बंद झाल्यामुळे ऑनलाईन शिक्षणासाठी त्याला लॅपटॉपची गरज होती. वडिलांचे छत्र हरवलेल्या ऋषिकेशची आई किरकोळ कामे करत असल्याने तो लॅपटॉप घेऊ शकत नव्हता. त्यावेळी त्याने सांगोला शहरातील हभप.सुभाष लऊळकर आणि माजी नगरसेवक अरुण काळे यांच्यामार्फत आपुलकी प्रतिष्ठानशी संपर्क साधल्यानंतर प्रतिष्ठानने लोकवर्गणी जमा करून त्याला तीन दिवसात लॅपटॉपची मदत केली होती. त्या मदतीची जाणीव ठेवून आपुलकी प्रतिष्ठान विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ऋषिकेश जाधव व त्याची आई यांनी प्रतिष्ठानच्या कार्यालयाला भेट देऊन नोकरीची गोड बातमी देऊन सर्वांना मिठाई दिली. तसेच प्रतिष्ठानच्या सुरू असलेल्या सामाजिक कार्याला ३ हजार रुपये देणगी दिली.

यावेळी ऋषिकेश व त्याच्या आईचा प्रतिष्ठान तर्फे सन्मान करण्यात आला. याप्रसंगी आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर यांचेसह सदस्य उपस्थित होते.

## विनापरवाना डिझेल विक्रीचा पर्दाफाश

### पांगरी येथे टँकरसह वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १७ मार्च-**

पांगरी परिसरात विनापरवाना डिझेलची वाहतूक करून गावोगावी विक्री केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी एका वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत सुमारे ४६० लिटर डिझेलसह वाहन ताब्यात घेण्यात आले आहे.

तहसील कार्यालयातील गोदाम व्यवस्थापक ऋषीकेश सुभाष धनवडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या परिस्थितीमुळे पेट्रोलियम पदार्थांची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून शासनाने विनापरवाना पेट्रोल-डिझेलची वाहतूक व विक्री रोखण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार तहसीलदार, बार्शी यांनी १६ मार्च २०२६ रोजी पांगरी पोलीस ठाणे हद्दीत विनापरवाना डिझेल वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

या आदेशानुसार ऋषीकेश धनवडे आणि पुरवठा लिपीक अमित शेळवणे हे पांगरी येथे तपासणीसाठी गेले असता, येडशी-बार्शी रोडवरील जय भवानी हॉटेलसमोर ग्राम महसूल अधिकारी यांनी थांबवलेली महिंद्रा पिकअप (क्रमांक चक-२५-ग-८०२५) आढळून आली.वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे ४६० लिटर डिझेल (किंमत अंदाजे ४१ हजार ७३१ रुपये) असल्याचे आढळले. वाहनचालक अजय भारत कसबे (रा. मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव) याच्याकडे डिझेल वाहतूक व विक्रीसाठी आवश्यक परवाना नसल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. तसेच तो गावोगावी फिरून डिझेल विक्री करत असल्याची कबुलीही त्याने दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात अत्यावश्यक वस्तू व सेवा अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे परिसरात विनापरवाना पेट्रोलियम पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर प्रशासनाने कडक कारवाईचा इशारा दिला आहे.



## माळेगावच्या तेजस गायकवाडची 'एमपीएससी'त बाजी

### पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १७ मार्च-**

माढा तालुक्यातील माळेगाव येथील तेजस विशाल गायकवाड याने नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पद मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे माळेगाव गावातून प्रथमच पोलीस उपनिरीक्षक होण्याचा मान तेजसने पटकावला आहे. तेजसच्या यशाची बातमी समजताच माळेगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनी फटाके वाजवून तसेच गुलालाची उधळण करत सवाद्य मिरवणूक काढून त्याचे स्वागत केले. या वेळी गावकऱ्यांनी मोठ्या जल्लोषात आनंद साजरा केला.

त्याचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, शिवसेना नेते संजय कोकाटे, नूतन जिल्हा परिषद सदस्या सविताताई संजय कोकाटे, नूतन पंचायत समिती सदस्य पोपट अनपट, रावसाहेब देशमुख, ब्रह्मदेव मस्के, आबासाहेब वाघ, गोरख देशमुख, विठ्ठल गायकवाड, सरपंच सुदर्शन गायकवाड, हभप तुकाराम पाटील, किसन पाटील, तुकाराम डोके, संजय लोकरे, केशव गायकवाड, किशोर सलगर, सूर्यकांत किर्ते, वासुदेव पाटील, धोंडीराम गायकवाड, परमेश्वर लोकरे, बापूसाहेब पाटील आदी मान्यवरांनी तेजस गायकवाड यांचे अभिनंदन केले.

तेजस याने चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण टेंभुर्णी येथील खुळे वस्ती जिल्हा परिषद शाळेत घेतले. त्यानंतर पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण अकलूज येथील सहकार महर्षी विद्यालयात पूर्ण केले. पुढे पुणे येथील झिल नरे कॉलेजमधून मेकॅनिकल अभियांत्रिकी पदवी प्राप्त केली. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून अधिकारी होण्याचा ध्यास घेतला.

---

## कै.कल्याणराव इंगळे उद्यान लोकार्पण व अर्ध पुतळ्याचे आज अनावरण

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. १७ मार्च-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व स्वामी सेवक कै.कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती मंदीर समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली.

बुधवार १८ मार्च रोजी सकाळी १० वा समर्थ पार्क मैंदर्गी रस्ता येथे उद्यान लोकार्पण व अर्धपुतळा कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते होईल. श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुरोहित वेशा सं . प.पू.मोहनराव (गुरुजी) पुजारी, हिरेमठ गौडगांव संस्थानचे शिवाचार्यरत्न श्री.ष.ब्र.डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी, जगद्गुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान नागणसूर तुप्पीन मठाचे श्री.म.नि.प्र.डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी, अक्कलकोट विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी, मादन हिप्परगा विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.अभिनव महाशिवलिंगेश्वर महास्वामीजी, हत्तीकणबस विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र. प्रभूशांत स्वामीजी, अक्कलकोट शिवपूरीचे प.पू.डॉ.पुरूषोत्तम राजीमवाले, श्री.स्वामी समर्थ समाधी मठाचे वे.शा.प.पू. अण्णू महाराज पुजारी यांच्या दिव्य सान्निध्यात व आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली उद्यानाचे लोकार्पण व उद्यानातील महालक्ष्मी मंदीर सुशोभिकरण सेवा अर्पण व पुजन कार्यक्रम होईल.



प्रमुख पाहुणे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, महाराष्ट्र राज्य शिवभक्त प्रतिष्ठानचे पै.अनिकेतभाऊ घुले, करमाळा पंचायत समितीचे सभापती संपतराव शिंदे, कराड येथील हुतात्मा बहुउद्देशीय अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष सुनील फडतरे, पुणे येथील यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे चेअरमन गणेश करे-पाटील, मडगाव गोवा येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचे संस्थापक जयेश नाईक, माजी पंचायत समिती सदस्य सिद्धेश्वर स्वामी, चिपळूण येथील उद्योजक डॉ.विलास मोरे, डॉ.विजय माटे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, उज्वलाताई सरदेशमुख आदी उपस्थित राहणार आहेत.

श्री स्वामी समर्थ रूग्णालयात विविध उपक्रम संपन्न होतील. यामध्ये आरोग्य शिबीर, ॲक्युप्रेशर शिबीर, रक्तदान शिबीर, सोलापूर जिल्हा इंग्रजी कार्यशाळा, कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन कडून गुणीजन पुरस्कार, कराड येथील हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्थेच्या वतीने गुणीजनांना राष्ट्रीय पुरस्कार, महाप्रसाद, श्री.स्वामी समर्थ रुग्णालयात जनरल फिजीशीयन डॉ.स्वप्निल हिप्परगी, डॉ.रोहित कुंभार, नेत्ररोग तज्ञ डॉ.स्वप्ना हिप्परगी, डॉ. राजेश मलंग, दंतरोग तज्ञ डॉ.नम्रता पवार यांच्या वतीने सर्वरोग निदान आरोग्य शिबीर होईल. गरजू रुग्णांनी या आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदीर समितीचे प्रथमेश इंगळे यांनी केले आहे.



## विद्यार्थ्यांनी नवनवीन संशोधनावर भर दिला पाहिजे : कुलगुरु डॉ. दामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**

विद्यार्थ्यांनी संगीत आणि नाट्य क्षेत्रामध्ये प्रयत्नपूर्वक नवनवीन संशोधनावर भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉक्टर लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

सोलापूर विद्यापीठ आणि पीएम उषा योजनेअंतर्गत विद्यापीठात संगीत आणि नाटक या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या सांगताप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी रजनीश जोशी, ललित कला आणि कला संकुलाच्या संचालिका डॉ. ज्योती माशाळे उपस्थित होते. या परिषदेसाठी ढाका बांगलादेश येथील नाट्य अभ्यासक शोवन कुमार दास ऑनलाइनने तर एमआयटी पुणे या संस्थेचे नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अमोल देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय आंबेजोगाईच्या नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी व डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे हे मान्यवर नाट्यविषयक आणि डॉ. मनीषकुमार वर्मा (दिल्ली विद्यापीठ) तर डॉ. अतिंद्र सरवडीकर (मुंबई विद्यापीठ) संगीत विषयाचे मार्गदर्शनसाठी उपस्थित होते.

या परिषदेमध्ये ७० संशोधकांनी सहभाग नोंदवला. तसेच ४५ रिसर्च पेपर या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सादर करण्यात आले.

---

## 'समृध्द ग्राम'साठी २५० गावांत चुरस; अंतिम टप्प्यात स्पर्धा रंगली

### लाखो-कोटींची बक्षिसे; मार्चनंतर होणार अंतिम पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ मार्च-**

मुख्यमंत्री पंचायतराज समृद्ध अभियान अंतिम टप्प्यात पोहोचले असून, जिल्ह्यातील तब्बल २५० गावांमध्ये 'समृद्ध ग्राम' होण्यासाठी चुरस निर्माण झाली आहे. स्पर्धेत आघाडी घेण्यासाठी गावांचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि प्रशासनातील अधिकारी एक-एक गुणांसाठी झटताना दिसत आहेत.

अभियानाच्या अंतिम टप्प्यात प्रत्येक घटकावर लक्ष केंद्रित करण्यात आले असून, गावागावांत स्वच्छता, करवसुली, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बळकटीकरणासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. गावकऱ्यांचाही या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे.

### गावांची जोरदार स्पर्धा

या स्पर्धेत विविध स्तरांवर आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे.तालुकास्तरावर पहिल्या तीन गावांना अनुक्रमे १५ लाख, १२ लाख व ८ लाख रुपये, तसेच विशेष निवडलेल्या गावांना ५ लाख रुपये मिळणार आहेत. जिल्हास्तरावर पहिल्या तीन गावांना ५० लाख, ३० लाख २० लाखांचे बक्षीस दिले जाणार आहे.विभागस्तरावर अनुक्रमे १ कोटी, ८० लाख व ६० लाखांचे बक्षीस मिळणार आहे. राज्यस्तरावर पहिल्या क्रमांकाच्या गावाला ५ कोटी, दुसऱ्याला ३ कोटी आणि तिसऱ्याला २ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

या अभियानाच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप कोहिनकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी विविध गावांना भेटी दिल्या. काही ठिकाणी त्यांनी मुक्काम करून ग्रामस्थांशी संवाद साधत कामकाजाचा आढावा घेतला. जानेवारी ते मार्च या कालावधीत अभियान अधिक गतिमान करण्यात आले असून, ३१ मार्च ही अंतिम मुदत असल्याने गावागावांत कामांची लगबग वाढली आहे. आता अंतिम पाहणी आणि गुणांकनानंतर कोणते गाव 'समृद्ध ग्राम'चा किताब पटकावणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### निवडीची बहुपातळी प्रक्रिया

स्पर्धेत सहभागी २५० गावांमधून प्रत्येक तालुक्यातून पाच गावांची निवड केली जाणार आहे. त्यामध्ये पहिली तीन आणि दोन विशेष गावे अशी एकूण ५५ गावे पुढील टप्प्यासाठी निवडली जातील. या गावांमधून जिल्हास्तरासाठी तीन गावे निश्चित होऊन त्यानंतर विभाग आणि राज्यस्तरावर अंतिम निवड होणार आहे.


CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अतिरिक्त आयुक्त मल्लिनाथ जेऊरे यांनी घेतले श्री मशरूम गणपतीचे दर्शन

**सोलापूर, दि. १७ मार्च-**
मुंबई येथील जीएसटीचे अतिरिक्त आयुक्त सोलापूरचे सुपुत्र मल्लिनाथ जेऊरे यांनी श्री मशरूम गणपतीची आरती व पूजा करून दर्शन घेतले.



यावेळी त्यांनी मंदिराची पाहणी व माहिती घेतली मंदिरातील सोयी सुविधा शिस्त स्वच्छता तसेच भक्तांची सेवा मंदिर समितीच्या वतीने घेतली जाते यावर त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी भक्त मंडळाच्या वतीने त्यांचा श्री मशरूम गणपतीची प्रतिमा शाल श्रीफळ प्रसाद देऊन मंदिराचे पुजारी श्री संजय पतंगे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री मशरूम गणपती भक्त मंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी, आप्पाशा जेऊरे, भैय्या पतंगे, दीपक देशमुख, ईश्वर पतंगे, गणेश हौशेट्टी, नागराज हौशेट्टी उपस्थित होते.



**महत्त्वाचे**



### ब्रिमा सागरच्या मोफत नेत्र शिबीरात २०९ रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. १७ मार्च-**
श्रीपूर येथील ब्रिमा सागर महाराष्ट्र डिस्टलरीज व रोटरी क्लब ऑफ अकलूज तर तसेच देसाई हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व मधुमेह तपासणी शिबिरात २०९ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये ४ जणांना मोतीबिंदू आढळून आला. यांचीही मोफत शस्त्रक्रिया २५ मार्च रोजी करण्यात येणार असल्याचे रोटरीचे अध्यक्ष केतन बोरावके यांनी सांगितले. या शिबिराचे उद्घाटन कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, वैद्यकिय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे, रोटरी क्लबचे अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, कल्पेश पांढरे, संदीप लोणकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिनकर बेंबळकर, चंद्रकांत भागवत, नरेश पाठक, सतीश डिंगरे, भागवत पारसे, अरविंद इंगळे, सत्यजित पाटील, हेमंत पाटील, नानासाहेब केचे, राष्ट्रीय साखर कामगार संघटनेचे सरचिटणीस नितीन बेनकर, सेक्रेटरी राजेंद्र होनमाने, सागर कोळी, सलील तांबोळी, सुरज शिंदे, ऋषिकेश सलगर उपस्थित होते. शिबीरास डायग्नोस्टिक सेंटरचे वैभव कांबळे, निसार शेख यांचे सहकार्य लाभले. केतन बोरावके यांनी प्रास्ताविक केले. प्रसाद अक्कलकोटकर यांनी सूत्रसंचालन केले, हेमंत पाटील यांनी आभार मानले.



### ग्राहक म्हणून नेहमी जागरुक रहा : तहसीलदार सचिन लंगुटे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ मार्च-**
ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. ग्राहकांना वस्तू निवडणे, त्याची गुणवत्ता आणि दर्जा यांचे प्रमाण जाणून घेण्याचा, माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. अनेकदा वस्तू खरेदी करताना ग्राहक बऱ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि याचाच गैरफायदा विक्रेते घेतात. त्यामुळे ग्राहकाने नेहमी जागरूक राहावे, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले. तहसील कार्यालय पंढरपूर येथे १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, पुरवठा निरीक्षक विजय बादल, पुरवठा सहा. उमेश हिंगमिरे, नेताजी ओव्हाळ उपस्थित होते. यावेळी ग्राहक पंचायतीचे सह सचिव अल्लापुरकर यांनी ग्राहक कायदा विषयक माहिती सांगून ग्राहक न्यायालयांमध्ये कशाप्रकारे तक्रारी मांडू शकतो आणि सार्वजनिक तक्रारी असतील तर त्या सीसीपीए या ग्राहक समितीकडे आपण कशा पद्धतीने मांडू शकतो याच्याबद्दल मार्गदर्शन केले. प्रास्ताविक पुरवठा निरीक्षक विजय बादल यांनी केले सूत्रसंचालन पुरवठा सहाय्यक उमेश हिंगमिरे यांनी केले तर आभार पुरवठा सहाय्यक नेताजी ओव्हाळ यांनी केले.



### हिंदुराष्ट्र सेनेकडून ३०० माता-भगिनींसाठी 'द केरला स्टोरी २' चित्रपटाचा मोफत शो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
हिंदुराष्ट्र सेनेच्या वतीने रविवारी सोलापूर येथील उमा मंदिर चित्रपटगृहात माता-भगिनींसाठी 'द केरला स्टोरी २' या चित्रपटाचा विशेष मोफत शो सुमारे ३०० माता-भगिनींना दाखविण्यात आला. समाजातील मुलींमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण करणे तसेच लव्ह जिहादसारख्या प्रकारांबाबत सतर्कता निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे हिंदुराष्ट्र सेनेचे शहरप्रमुख रवि गोणे आणि शहर संघटक आनंद मुसळे यांनी सांगितले.

चित्रपट सुरू होण्यापूर्वी उपस्थित माता-भगिनींनी ''जय श्रीराम'' तसेच ''भारत माता की जय'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. चित्रपट पाहिल्यानंतर अनेक माता-भगिनी भावनिक झाल्या. यावेळी बोलताना शहरप्रमुख रवि गोणे यांनी, ''आपल्या हिंदू धर्माचे महत्त्व ओळखा आणि लव्ह जिहादसारख्या प्रकारांना बळी पडू नका,'' असे आवाहन केले. या कार्यक्रमाला हिंदुराष्ट्र सेनेचे अंबादास गोरंटला, विलास पोतू, श्रीधर आरगोंडा, विजय महिंद्रकर, प्रकाश आसादे, सागर कोळी, विजय गोणे,हणमंतू श्रीराम,अभिजीत अरळीकर, विनायक नामाजी, रुद्रशित्य गुरुकुलचे विवेक मिस्कीन , अभिषेक जेटगी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





## उजनी धरणात होणारे जल प्रदूषण रोखण्यासाठी १०० कोटींची तरतूद करा

### आमदार समाधान आवताडे यांची अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ मार्च -**
उजनीत होणारे जल प्रदूषण रोखण्यासाठी शंभर कोटीची तरतूद करावी, अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे.

महाराष्ट्र शासनाने उजनी धरणावर पर्यटन स्थळ उभारण्यास मंजुरी दिली असून ५४१ कोटी १८ लाखाचा आराखडा तयार झाला आहे. यामध्ये महाराष्ट्रात पर्यटन वाढीसाठी अनेक उपक्रम राबवले जाणार असून राष्ट्रीय दर्जाचे कृषी पर्यटन स्थळ उजनी धरणावर उभारण्यात येणार आहे, मात्र विविध भागातून उजनीत येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्यामुळे उजनीचे प्रदूषण वाढत असून ते पाणी पूर्णपणे प्रदूषित होऊन आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे यासाठी पर्यटन विकासासाठी मंजूर झालेल्या रकमेतून शंभर कोटी उजनीच्या पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी वापरणार का? हा प्रश्न आमदार आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केला आहे.

आमदार आवताडे म्हणाले की, सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था उजनी धरणावर अवलंबून असून सोलापूरसाठी उजनी धरण वरदानी म्हणून धरणाकडे पाहिले जाते पिकाच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न या धरणावरून सुटत आहे मात्र या धरणातील जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने प्रदूषण कमी करण्यासाठी पावले उचलणे अत्यंत गरजेचे असल्याची बाब देखील आमदार आवताडे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे शासनाने हा जल पर्यटनाचा निर्णय घेतला असला तरी याबरोबर उजनीचे पाणीही स्वच्छ व आरोग्यदायी राहिले पाहिजे यासाठी स्वतंत्र निधीची उपलब्धता करून जल प्रदूषणावर ही शासनाने काम करावे अशी मागणी आमदार आवताडे यांनी केली आहे. या प्रश्नाला उत्तर देताना कृषी मदत पुनर्वसन वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले की मुख्यमंत्र्यांची बैठक घेणार असून या बैठकीमध्ये यावर निर्णय घेण्यात येईल.

#### जल पर्यटन आनंदाची पर्वणी ठरणार

उजनी धरण सोलापूर नगर व पुणे या जिल्ह्यात पसरलेले असून १४५ किलोमीटर परिसरात पाणी पसरलेले असते. धरणाजवळून सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग गेला असल्याने जलपर्यटनासाठी ही जमेची बाजू आहे, याशिवाय दक्षिण व उत्तर भारताला जोडणारा रेल्वे मार्ग कुर्डूवाडी भिगवण या पट्ट्यातूनच गेला आहे. पंढरपूरचा पांडुरंग, तुळजापूरची तुळजाभवानी, अक्कलकोटचे स्वामी समर्थ यांच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांसह विविध राज्यातील भाविक सोलापुरात येतात. त्यामुळे त्यांच्यासाठी उजनीवर झालेले जल पर्यटन आनंदाची पर्वणी ठरणार आहे.




## अकलूज येथे वाहतूक चिन्हे उद्यानाचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. १७ मार्च-**
रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत अकलूज उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात निर्माण करण्यात आलेल्या वाहतूक चिन्हे उद्यानाचे अनावरण प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या हस्ते पार पडले. उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांच्या अध्यक्षते खाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

अकलूज येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात निर्माण करण्यात आलेले वाहतूक चिन्हे उद्यान हे शिकाऊ लायसन्स व पक्के लायसन्स तसेच इतर कार्यालयीन कामकाजाकरिता आलेल्या नागरिकांना रस्ता सुरक्षेविषयी संपूर्ण मार्गदर्शन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.या उद्यानात रस्त्यावर असणारी बंधनकारक नियम,इशारा देणारे फलक,माहिती देणारी चिन्हे, रस्त्यावरील विविध प्रकारच्या खुणा,अत्यंत महत्त्वाचे रस्ता सुरक्षा नियम, सुरक्षितपणे वाहन चालविण्याविषयीच्या महत्त्वपूर्ण सूचना, अपघात समयी प्रथमोपचार पद्धत इत्यादी सर्व माहिती प्रतीकात्मक स्वरूपात या उद्यानात प्रदर्शित करण्यात आलेली आहे. याप्रसंगी रस्ता सुरक्षा अभियानात आयोजित केलेल्या रॅलीमध्ये सहभाग व सहकार्य केलेल्या शिवरत्न शिक्षण संस्था अकलूज, श्रीराम शिक्षण संस्था पाणीव, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय अकलूज तसेच उल्लेखनीय कामगिरी केलेल्या संस्था व नागरिकांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमप्रसंगी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संभाजी गावडे, अश्विनकुमार पोंदकुले, मोटार वाहन निरीक्षक सचिन झाडबुके, मयूर भोसेकर, वैभव राऊत यांची उपस्थिती होती. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जागृती होण्यासाठी अधिकाधिक शाळा महाविद्यालयांनी हे उद्यान आपल्या विद्यार्थ्यांना दाखवावे असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांनी केले आहे. प्रास्ताविक सचिन झाडबुके यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनुक्रमे अक्षय साळुंखे व अर्चना दराडे यांनी केले.

## शिंगणापूर यात्रेसाठी माळशिरसची प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १७ मार्च-**
संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूरच्या महादेवाची यात्रा दि.१९ मार्चपासून सुरू होत असून यात्रेतील भाविकांच्या सोयी सुविधांच्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असल्याची माहिती माळशिरस पंचायत समितीचे नूतन सभापती दत्ता मगर यांनी दिली.

गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी सांगितले की, भाविकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी पाच टँकरची मागणी करण्यात आली आहे. कारुंडे व कोथळे येथील पाणीपुरवठा विहीरीतून पाणी भरून या पाच टँकरद्वारे दररोज ४ ते ५ खेपा करून शिंगणापूर घाट,पिंपरी परिसर व कोथळे परिसर, मुंगी घाट येथील भाविकांना पाणी पुरविण्यात येणार आहे.



पाणी शुद्धीकरणासाठी व तपासणीसाठी आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच शिंगणापूर भवानी घाटातील दोन शासकीय व दोन खाजगी टाक्यामध्ये पाणीसाठवण केली जाणार आहे.शिवाय घाटातही टँकर उभे करण्यात येणार आहेत. सुरळीत पाणीपुरवठयासाठी पाणीपुरवठा विभागातील सर्व शाखा अभियंता, ग्रामसेवक व आरोग्य कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आली आहे.

कोथळे ओढ्यातील कावडी भेटीच्या ठिकाणी नळ कोंडाळे चालू ठेवण्याच्या, टाक्या स्वच्छ करण्याबरोबरच, हातपंप दुरुस्त करून चालू ठेवण्याच्या, वीजपुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्याच्या व झाल्यास इंजीनद्वारे टँकर भरण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. भाविकांच्या मार्गावरील उंबरदेव नांद्रुक येथीलही पाण्याच्या टाक्या स्वच्छ करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय कारुंडे, पिंपरी, कोथळे, मोरोची, धर्मपुरी नळ पाणीपुरवठा योजना, हातपंप तसेच नातेपुते बुचडे विहीर, धर्मपुरी सार्वजनिक विहीर या ठिकाणी टँकर भरण्याची सोय करण्यात आली आहे.

आरोग्य यंत्रणा याशिवाय दिनांक ३० मार्च रोजी कोथळे येथील मुंगी घाट चढून कावडी घेऊन भाविक शिंगणापूरला धार घालण्यासाठी जातात, त्यांच्यासाठी म्हणून त्यादिवशी प्रा. आ. केंद्र मोरोची व ग्रामीण रुणालय नातेपुते यांचे वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांची दोन अँब्युलन्ससह कार्यरत पथके व एक १०८ रुग्णवाहीका उपलब्ध ठेवण्यात येणार असून मार्गावरील ग्रामीण रुग्णालय नातेपुते प्रा आ केंद्र मोरोची व प्रा केंद्र मांडवे येथे यात्रा कालावधी मध्ये २४ तास आंतररुग्ण विभाग चालू ठेवण्यात येणार आहे. तसेच भाविकांच्या सेवेसाठी ३ वैदयकिय अधिकारी, ४ आरोग्य सहाय्यक, १८ आरोग्य सेवक, १३ आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यीका ३ तैनात ठेवले आहेत.

**गुढीपाडवा सणानिमित्त पंढरपुरात उद्या भव्य मोटारसायकल शोभायात्रा**

### शिवतिर्थावर हिंदू संमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१७ मार्च-**
सकल हिंदू समाज व हिंदू नववर्ष स्वागत समिती पंढरपूर यांच्या वतीने गुढीपाडवा तथा हिंदू नववर्ष दिनानिमित्त भव्य मोटारसायकल शोभायात्रा व हिंदू संमेलनाचे आयोजन १९ मार्च रोजी केले आहे.

दुपारी साडेचार वाजता शोभायात्रेचे आयोजिली आहे. या शोभा यात्रेस येथील टिळक स्मारक मैदानातून प्रारंभ होणार आहे. त्या नंतर ही शोभा यात्रा संपुर्ण शहरातून फिरून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौकात तिची सांगता होणार आहे. या शोभा यात्रेसाठी महिला,पुरुष, मुले, मुली यांनी पारंपारिक वेषभुषेत आपल्या दुचाकीसह बहुसंख्येने सहभागी व्हावे. तसेच शोभा यात्रेच्या मार्गावर कमानी उभ्या करुन, सडा-रांगोळी करुन नागरिकांनी या शोभायात्रेचे स्वागत करावे असे देखील आवाहन आयोजकांकडून करण्यात आलेले आहे. शोभा यात्रेच्या समाप्ती नंतर सायंकाळी साडेसहा वाजता येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवतीर्थावर हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

#### असा असणार शोभायात्रेचा मार्ग

शोभायात्रेस टिळक स्मारक येथून प्रारंभ होणार आहे. त्या नंतर स्वा.सावरकर पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, प्रबोधनकार ठाकरे चौक ( नवीन कराड नाका), लिंक रोडमार्गे क.भा. पाटील चौक, सरगम टॉकीज चौक, कर्नल भोसले चौक, जुनीपेठ, अंबाबाई पटांगण, गोविंदपूरा मार्गे भजनदास चौक त्या नंतर प्रदक्षिणा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सांगता होणार आहे.

## घरकुलाच्या हप्त्यावर 'लाचखोरीचा सापळा'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/पंढरपूर, दि.१७ मार्च-**
प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाच्या शेवटच्या हप्त्यासाठी लाच मागितल्याप्रकरणी पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी व शिपाई यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून रंगेहात पकडले. या कारवाईमुळे पंढरपुर परिसरात खळबळ उडाली आहे.



**पंढरपूर तालुक्यातील उंबरगावचे ग्रामपंचायत कर्मचारी १२ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले**

या प्रकरणात ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत प्रकाश मुकरे (वय ४५) आणि ग्रामपंचायत शिपाई दत्तात्रय अभिमान कांबळे (वय ४५) यांचा समावेश आहे. यापैकी कांबळे यांना तक्रारदाराकडून १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने पकडले. दोघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्यात सुरू आहे.

एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराला प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. या योजनेतून १ लाख २० हजार रुपयांचे अनुदान मंजूर झाले होते. मात्र शेवटचा हप्ता देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांची लाच मागितली होती.

१३ मार्च रोजी पडताळणीदरम्यान ग्राम पंचायत शिपाई कांबळे यांनी स्वत:साठी व अधिकारी मुकरे यांच्यासाठी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तडजोडीतून १२ हजार रुपये देण्याचे ठरले.यानंतर १६ मार्च रोजी एसीबीच्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून पैसे स्वीकारताना कांबळे यांना रंगेहात पकडण्यात आले.

ही कारवाई एसीबी पुणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील तसेच पोलीस उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते, शैलेश पवार व एसीबी सोलापूरच्या पथकातील अधिकारी-कर्मचारी सहभागी होते. दरम्यान, एसीबीने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय कामासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाच मागितल्यास घाबरून न जाता तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. अशा प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्यात येते, असे पोलीस उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांनी स्पष्ट केले.



## युवा पँथर सामाजिक संस्थेच्यावतीने खा. ज्योती वाघमारे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ मार्च-**
युवा पँथर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यसभेच्या खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

डॉ. वाघमारे यांच्या निवडीमुळे आंबेडकरी चळवळीतील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात एका अभ्यासू नेतृत्वाला संधी मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. संस्थेच्या वतीने डॉ. वाघमारे यांना सन्मानचिन्ह, शाल देऊन गौरविण्यात आले. यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी युवा पँथर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आतिश बनसोडे, भिम शक्ती सेना तरुण मंडळाचे अध्यक्ष गौरव कांबळे, रोहन आखाडे, विशाल कांबळे उपस्थित होते.